■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२८० ■ बुधवार, दि. दि. १५ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -280 ■ Wednesday, 15 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

# दैनिक अट्टल संकेत
# ATTAL SANKET



छाया – दिनेश परदेशी

# ‘नामांतराचा लढा हा केवळ विद्यापीठाची पाटी बदलणारा नव्हता, तर तो समता, स्वातंत्र्य, बंधुभाव पुढे नेणारा लढा होता’

## नामविस्तार दिनानिमित्त शहिदांना आदरांजली

## विद्यापीठ परिसरात सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल



सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**दिनेश परदेशी**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठवाड्यातील विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिल्यानंतर नामविस्तार दिन साजरा करायला सुरुवात करण्यात आली. त्यानिमित्ताने आज १४ जानेवारीला विद्यापीठ गेटवर राज्यभरातून अनेक अनुयायी एकत्र येऊन बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव संभाजीनगरच्या मराठवाडा विद्यापीठाला देण्यासाठी सुमारे १७ वर्षे आंदोलन झाले. नामांतराचा लढा हा केवळ विद्यापीठाची पाटी बदलणारा नव्हता, तर तो समता, स्वातंत्र्य, बंधुभाव पुढे नेणारा लढा होता. तो नामविस्तार दिन १४ जानेवारी म्हणून मोठ्या उत्साहाने संभाजीनगर येथे साजरा केला जातो. यंदा या दिवशी मोठ्या संख्येने अनुयायी अभिवादनासाठी दाखल झाले होते.

छत्रपती संभाजीनगर शहराजवळच्या भागाचे नागसेनवन असे नामकरण करून तेथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या मिलिंद म हाविद्यालयाची स्थापना त्यांनी केली.

याच परिसरात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५८ या वर्षी मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले. पुढे नामांतराच्या लढ्यानंतर शरद पवार मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र शासनाने १४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठ याचे नाव बदलून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार केला गेला. सामाजिक लढ्यात १९७२ ला दलित पँथरची स्थापना झाली. संभाजीनगरच्या मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे, या मागणीनं जोर धरला. १९७४च्या मराठवाडा विकास आंदोलनात नामांतराची मागणी झाली. दलित युवक आघाडी ही नामांतराच्या मागणीचा पाठपुरावा करत असे. १९७७ ला तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी या मागणीची दखल घेतली. नामांतराचं आश्वासनही दिलं. १९७८ला महाराष्ट्रात सरकार बदललं त्यानंतर २७ जुलै १९७८ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अशी घोषणा झाली.

दलित पँथर नेते प्रा. अरुण कांबळे यांनी या नाम विस्तारास विरोध दर्शविला. पँथरला निर्भेळ नामांतर हवे होते. शेवटी एका विद्यापीठाची फाळणी झाली. एकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद तर दुसऱ्याला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अशी विस्तारित नावं दिली गेली. तो नामविस्तार दिन १४ जानेवारी म्हणून मोठ्या उत्साहाने औरंगाबाद येथे साजरा केला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव संभाजीनगरच्या मराठवाडा विद्यापीठाला देण्यासाठी सुमारे १७ वर्षे आंदोलन झाले.



३१ व्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त ज्या शहिदांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्यांना आदरांजली वाहून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना सामाजिक न्याय विभागाचे माजी कॅबिनेट मंत्री मा.खा. चंद्रकांत हंडोरे साहेब व भीमशक्ती सामाजिक संघटनेचे पदाधिकारी.



३१ व्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त विद्यापीठ परिसरात विविध संस्था संघटना, पक्षांच्या वतीने शहीदांना आदरांजली कार्यक्रम, बाबासाहेब अभिवादन, भव्य महाभोजनदान कार्यक्रमांचे आयोजन भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आले होते. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. संघटनेच्या वतीने भोजन दान संकल्पनेचे सर्व भीम अनुयायांनी कौतुक केले. सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन देखील उत्कृष्ठ करण्यात आले. विविध भीम गीतांवर तरूण तरूणीं नी ठेका धरला होता. मुख्य स्टेजसमोरच महिला व तरूणींनीसाठी मोठा स्पेस राखीव ठेवल्याने महिलांना सुरक्षित वाटत होते. संघटनेकडून सामाजिक न्याय विभागाचे माजी कॅबिनेट मंत्री मा.खा. चंद्रकांत हंडोरे यांचे भव्य स्वागत करण्यात आले. सहाय्यक पोलिस निरीक्षक कैलास लहाने व भीमशक्ती सामाजिक संघटनेचे शहर जिल्हाध्यक्ष सतीष नरवडे यांनीही पुष्पहार व शाल देवून मा.खा. चंद्रकांत हंडोरे साहेबांचा सत्कार केला.



भव्य भोजन दान






वंचित बहुजन आघाडी

संपादकीय

# कुंभमेळ्याचे अमृतपर्व

हिंदू धर्मियांमध्ये धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला जाणारा कुंभमेळा यंदा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या काळात उत्तर प्रदेशात प्रयागराज येथे संपन्न होत आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांच्या पवित्र संगमावर लाखो भाविक या उत्सवाला उपस्थित राहून आशीर्वाद आणि पवित्र स्नानाचे पुण्य मिळवतात. हा जगातील सर्वात मोठा सोहळा म्हणून ओळखला जातो. भारत वगळता अन्यत्र कोठेही एवढ्या प्रचंड प्रमाणात मेळ्याचे आयोजन होत नाही आणि एवढ्या उत्स्फूर्ततेने नागरिकही अशा प्रकारे सहभागी होत नाहीत. कुंभमेळ्याला एका दिवसात कोट्यवधी भाविक एकाच ठिकाणी येतात आणि तेही निमंत्रणाशिवाय. ही अचंबित करणारी गोष्ट आहे. विशेष म्हणजे आजच्या आधुनिक काळात दळणवळणाच्या सुविधांची विपुल उपलब्धता आहे. परंतु अशा प्रकारच्या कोणत्याही सुविधा अस्तित्वातच नव्हत्या त्या काळापासून भाविकांचा महापूर कुंभमेळ्यात पाहावयास मिळालेला आहे. त्यामुळेच कुंभमेळा हा ऐतिहासिक आणि 'न भूतो न भविष्यति' असा असतो. अत्यंत आश्चर्यकारक परंपरा, रीतीरिवाज आणि प्रथांची प्रचिती कुंभमेळ्यामध्ये येते. कितीही संकटे आली तरी कुंभमेळा हा ठरलेल्या दिवशी आणि ठरलेल्या ठिकाणी बिनदिक्कतपणे पार पडतो. दुष्काळ असो, उपासमारीचे सावट, महासाथ, नैसर्गिक आपत्ती, कोरोना यासारखी कितीही संकटे आली तरी कुंभमेळ्याने आपली परंपरा जोपासली आणि भाविकांना अमृतअनुभव दिला.

कोट्यवधी जनतेसाठी कुंभमेळ्यात सहभागी होण्याचा अर्थ हा केवळ परंपरेचे पाईक होण्यापुरता मर्यादित नाही तर सनातन आणि आध्यात्मिकतेची पाळेमुळे घट्ट करणे आणि तो वारसा घेऊन परतणे असा आहे. हा कुंभमेळा एकार्थाने ऐक्यभाव, पावित्र्याची जपणूक आणि मोक्षप्राप्तीकडे वाटचाल करण्याचा मार्ग आहे. कुंभमेळ्याचा समृद्ध इतिहास हा भाविकांसाठी विशेष महत्त्वाचा ठरतो. ती एक आध्यात्मिक अनुभूती आहे. समुद्रमंथनातून बाहेर निघालेला अमृताचा थेंब शोधण्यासाठी आणि आपल्या जीवनाची दोरी आणखी बळकट करण्यासाठी मानवीसमाज त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान करण्यासाठी जमतो. तो क्षण साधताना मेळ्याचे आकर्षण ही बाब त्याच्यासाठी दुय्यम राहते. आता हळूहळू आध्यात्मिकेतेचे आकर्षण भाविकांवर लादले जात असले आणि याच आकर्षणाला अध्यात्माप्रमाणे महत्त्व दिले जात असले तरी यामुळे कुंभमेळ्याचे मर्म अबाधित आहे. अर्थात बदलत्या काळानुसार कुंभमेळ्यातही आता बदल घडत आहे. यंदा प्रयागराजमध्ये भरलेल्या कुंभमेळ्यामध्ये भाविकांना राहण्यासाठी आलिशान टेंट आहेत. या टेंटचे एक दिवसाचे भाडे लाखांपर्यंत आहे. तेथे पंचतारांकित हॉटेलसारख्या सुविधा आहेत. पायी चालण्याची गरज भासू नये यासाठी गोल्फ कार्ट आहे. स्वादिष्ट भोजनाचे मेन्यू आहेत. प्रयागराजला पोहोचण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून विमानसेवा सुरू केली आहे. विशेष बडदास्त ठेवली जात आहे. संगमावर स्नान करण्यासाठी विशेष सोय करण्यात आली आहे. मेळा आणि अमृतकुंभ याचा अनुभव घेताना भाविकांना थोडाही त्रास होणार नाही, याची पूर्णपणे खबरदारी आयोजकांकडून घेतली जात आहे. प्रयागराज आणि महाकुंभ स्थळावर २,३०० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. जेणेकरून नियंत्रण केंद्रांच्या माध्यमातून लोकसंख्येची घनता विश्लेषण, गर्दी नियंत्रण, घटनेचे वार्तांकन आणि स्वच्छतेवर लक्ष ठेवण्यास मदत होईल. गोंगाटापासून दूर, आध्यात्मिक शांततेचा अनुभव प्रदान करणाऱ्या जागेवर राहण्याची, खाण्याची आणि आरामाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. फक्त पैसे पाहिजेत. ते नसतील तर सरकारकडून बिल भरण्यात येणारा व्हिआयपीचा टॅग हवा. बड्या कंपनीचे सीईओ, उद्योगपती यांच्याबरोबरच सरकारसाठी जे अतिमहत्त्वाचे आहेत त्यांच्यासाठी कॉर्पोरेट सुविधा केली आहे.

या पलीकडे आणखी एक प्रचंड जग आहे. कुंभमेळ्याचे स्वप्न बाळगून असणाऱ्यांच्या झोपड्या लाखो रुपये मोजून आलिशान कॉटेजचा अनुभव प्रदान करणाऱ्यांच्या तुलनेत अलौलिक अनुभव देतात. कडाक्याच्या थंडीची रात्र, शीत लहर याचा कोणताच परिणाम त्यांना जाणवत नाही. संगमाच्या किनाऱ्यावर असलेल्या जनसमुदायांना कोणतीही टेंट सिटी महत्त्वाची वाटत नाही आणि त्यांना संगमाचे पवित्र पाणी आणि डुबकी महत्त्वाची वाटते. नदीकाठच्या वाळूतून अनेक किलोमीटर अनवाणी चालण्याचा अलौकिक आनंद त्यांना घ्यावयाचा असतो. आखाड्याच्या पंगतीतील डाळ भात, भंडाऱ्यातील पोळी आणि भात या गोष्टी त्यांना जमिनीवर असल्याचे दाखवून देतात. कुंभमेळ्यामध्ये सहभागी होणाऱ्या किंवा काम करणाऱ्या कोट्यवधी भाविकांना निमंत्रणाची गरज नाही. गावागावातील प्रमुखांकडून निमंत्रण पत्रिका देण्याची देखील गरज भासत नाही. कुंभमेळा हा कोणा एकाचा नाही, तो सर्वांचाच आहे. तेथे कोणालाही बोलावले जात नाही. जनसमुदाय स्वत:चा पैसा खर्च करून, धक्काबुकी सहन करत या भूमीवर दाखल होतो. सर्वसामान्य आणि व्हिआयपी अशा दोघांसाठी कुंभाचे जग वेगवेगळे असले तरी त्यापासून उत्पन्न घेणाऱ्यांसाठी कुंभमेळा ही एक व्यवसायाची मोठी संधी आहे.

# लॉन्गमार्च भूमिका: जिंकू किंवा मरू !

## (१४ जानेवारी: मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन सप्ताह विशेष)

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वेरूळ-अजिंठ्यालगतच तत्कालीन छत्रपती संभाजीनगर परिसरात एक मोठे शिक्षण, ज्ञानकेंद्र उभारण्याची योजना आखली होती. प्रामुख्याने आधुनिक शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजातील बहुसंख्यकांसाठी हे नियोजन होते. छत्रपती संभाजीनगर शहराजवळच्या भागाचे नागसेनवन असे नामकरण करून तेथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या मिलिंद महाविद्यालयाची स्थापना त्यांनी केली. याच परिसरात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन १९५८या वर्षी मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले. पुढे नामांतराच्या लढ्यानंतर मा.शरद पवार साहेब मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र शासनाने दि.१४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार केला गेला. अधिक रोचक व ज्ञानवर्धक संकलित माहिती श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या लेखात वाचा... संपादक.**

नामांतर आंदोलन प्रारंभ इतिहासाची आज ४५ वर्ष उलटली. दि.२७ जुलै १९७८मध्ये विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव देण्याचा ठराव पारित झाला. हा आनंद आंबेडकरी अनुयायी अनुभवत असतानांच प्रतिगाम्यांच्या पोटातील पाण्याने कुटील डाव सोडला. सरकारच्या निर्णयाला जातीचा रंग दिला आणि दलितांच्या घरांची राखरांगोळी करण्यास सुरुवात केली. परंतु बाबासाहेबांच्या समतेच्या विचारांचे निळे वादळ प्यालेल्या कार्यकर्त्यांनी गावखेड्यातील बांधवांचे धगधगते मरणतांडव बघीतले आणि पेटून उठले कार्यकर्त्यांचे सूर्यास्त्र. डोक्याला निळे कफ़न बांधून ४ ऑगष्ट रोजी दीक्षाभूमीची माती माथ्याला लावून चळवळीतील नायकांनी पेटलेल्या आभाळातील एक गरुडझेप होती ती. प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वात लाँगमार्च काढला गेला. यामध्ये मामा सरदार, कवि.इ.मो.नारनवरे, सुरेश घाटे, बबन बोदांटे, जगदीश थुल, थॉमस कांबळे, जे.के.नारायणे, गोपाळराव आटोटे, नामदेवराव खोब्रागडे, दिलीप पाटील, नरेश वहाणे, भीवा बडगे, सरोज मेश्राम यांच्यासारखे लढाऊ कार्यकर्ते लढण्यासाठी सज्ज झाले होते. याशिवाय दक्षिण नागपूर येथे सुखदेव रामटेके यांच्या नेतृत्वातही एक लढा लढला जात होता. पोलिसांनी दलितांच्या जोगीनगर, भीमनगरात अश्रूधूर फ़ेकले असताना ते कॅच करून पुन्हा पोलिसांकडे भिरकावणा□या कार्यकर्त्यांनी आजही या नामांतर आंदोलनाचा इतिहास डोळ्यात साठवून ठेवला आहे. नागपूरात चोहिकडे आंदोलन पेटले होते, पश्चिमचे आंदोलन □ड.विमलसूर्य चिमणकर, उत्तरचे आंदोलन प्रा.रणजित मेश्राम, उपेंद्र शेंडे यांच्यापासून तर राजन वाघमारे यांच्यापर्यंत लढला गेला. माजी आमदार शेंडेंचे उपोषण लाँगमार्चनंतरचा एक महत्त्वाचा टप्पा होता. दक्षिणेत भूपेश थुलकर, दादाकांत धनविजय, अमर रामटेके, सुधाकर सोमंकुवर, मधु दुधे, विलास पाटील, बाळु हिरोळे, सुनील लामसोंगे अशी असंख्य नावे घेता येतील. वर्धापन दिनाच्या पर्वावर नामांतराचा वणवा कार्यकर्त्यांच्या जणू बुबुळात पेटला असल्याचे दिसत आहे. आंदोलनाचे चित्र कार्यकर्त्यांनी वर्धापन दिनाच्या पुर्वसंध्येला चर्चेतून उभे केले. मराठवाड्यात शिक्षणाची गंगा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आणली, औरंगाबाद शहरात मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून शैक्षणिक दृष्ट्या अप्रगत असलेल्या मराठवाड्याला प्रगत करण्याचं काम महामानवाने केले आणि त्याच मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेबांचे नाव देण्याचा मुद्दा उपस्थित झाला तेव्हा, अनंत भालेराव, गोविंदभाई श्रॉफ़ या अविचारी माणसांनी विरोध केला. त्यांच्या या विरोधामुळे महाराष्ट्रातील तमाम आंबेडकरी जनता पेटून उठली व नामांतराची मागणी लावून धरली. ठिकठिकाणी मोर्चे, आंदोलने होवू लागले, नामांतराला विरोध म्हणून जातियवादी लोकांनी दलितांवर अन्याय, अत्याचार करण्यास सुरुवात केली, जाळपोळ करणे आरंभिले. ज्यांना धडपणे म ाहीत नव्हते त्या दीनदुबळ्या दलितांवर खेडोपाडी अमानुष अत्याचार करण्यात आले. आईचे लेकरू आईविना पोरके झाल्यासारखी दलित बांधवांची अवस्था झाली होती. एवढे होत असतानाही धाडसी भीमसैनिकांनी कधीच माघार घेतली नाही. फ़क्त बाबासाहेबांच्या नावासाठी दलित बांधवांनी अनेक अन्याय- अत्याचार, जुलूम सहन केले. गावोगावी, शहरात आणि खेड्यापाड्यापर्यंत नामांतराच्या आंदोलनाची ठिणगी पडलेली होती. जिकडे-तिकडे एकाच नारा गुंजत होता ङ्गनामांतर झालेच पाहिज.ङ्ग नांदेडमध्ये दलित पॅन्थरच्या गौतम वाघमारे या कार्यकर्त्याने सरकार नामांतर करत नाही म्हणून स्वतःला भरचौकात जाळून घेतले. अखेरच्या श्वासापर्यंत एकाच नारा होता, 'नामांतर झालेच पाहिजे' बाबासाहेबांच्या नावासाठी त्याने आपल्या प्राणाचे बलिदान केले. परभणी जिल्ह्यातही पोचिराम कांबळे यांचे हात-पाय तोडण्यात आले. त्यांनाही जातीयवादी सैतानांनी जर्जर करून ठार मारले. जनार्धन मवाडे, संगीता बनसोडे, सुहासिनी बंसोड, प्रतिभा तायडे, अविनाश डोंगरे, चंदन कांबळे, दिलीप रामटेके, रोशन बोरकर असे कितीतरी दलित क्रांतिवीर नाम ंतराच्या लढ्यात शहीद झाले.



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

जातीयवादी सरकार नामांतर करत नाही म्हणून दलितमुक्ती सेनेचे सरसेनापती आणि लाँगमार्च प्रणेते प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी दलित बहुजन सम ाजाची फ़ौज जमा करून नागपूर ते औरंगाबाद असा लाँगमार्च आयोजित करून 'जिंकू किंवा मरू', जळतील नाहीतर जाळून टाकतील' अशी आक्रमक भूमिका घेतली. लाँगमार्च मधील निष्पाप लोकांवर इंग्रजानाही लाजवेल अशा क्रूरपणे लाठीहल्ले केले. अश्रुधुराच्या नळकांड्या फ़ोडण्यात आल्या, कित्येकांना तुरुंगात डांबले. या निष्पाप दलितांचा गुन्हा काय? तर आपल्या पित्याचे- बाबासाहेबांचे नाव विद्यापीठाला द्यावे ही सरकारी मागणी. ज्यांनी दीनदलित, पिचलेल्या आणि उच्चभ्रू समाजाने वाळीत टाकलेल्या समाजातील माणसाला माणूसपण मिळवून दिले, जगण्याचा हक्क दिला, त्या उत्तरदायित्वापोटी बाबासाहेबांचे नाव विद्यापीठाला द्यावे, ही रास्त व न्यायपूर्ण मागणी गुन्हा ठरवून अमानुष वागणूक देणाऱ्यांचा निषेध केला पाहिजे. तत्कालीन मुख्यमंत्र्याला समजले की बाबासाहेबांची ही लेकरे बाबासाहेबासाठी प्राण द्यायलाही मागेपुढे पाहात नाहीत. जर यांच्या संयमाचा अंत पाहिला तर हेच लोक दुस□यांचा प्राण घ्यायलाही मागेपुढे पाहणार नाहीत. त्यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोप□यातून एकच आवाज होता 'नामांतर, नामांतर, नामांतर...!' चारही बाजूने सरकारच्या नाड्या आवळल्या जात होत्या. त्यांच्यासमोर नामांतराशिवाय पर्याय उरला नाही. १७ वर्षाच्या कडव्या संघर्षानंतर शेवटी सरकारला माघार घ्यावी लागली व दि.१४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद' असा नामविस्तार करण्यात आला. ज्या महामानवाने देशाची राज्यघटना लिहिली, मराठवाड्यात उच्च शिक्षणासाठी विद्यापीठ असावे, ही सर्वप्रथम कल्पना मांडली त्या महापुरुषाचे नाव विद्यापीठाला देण्यासाठी १७ वर्ष संघर्ष करावा लागला. नामांतर झाले परंतु अर्धवट नामांतर झाले, ही खंत आजही भीमसैनिकांच्या मनात आहे. विद्यापीठाचे पहिले नाव 'मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद' असे होते. नामांतरानंतर 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद' एवढेच झाले. नामांतराची लढाई ही प्रतीकात्मक सामाजिक समतेची लढाई होती. दि.१४ जानेवारी १९९४ पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रवेशद्वार हे आंबेडकरी समाजाचे प्रेरणास्थान बनले आहे. दरवर्षी १४ जानेवारी यादिवशी आंबेडकरी जनता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठच्या प्रवेशद्वाराची मनोभावे पूजा करते. जणूकाही साक्षात आपण बाबासाहेबांपुढेच नतमस्तक होत आहोत या श्रेद्धेने द्वारापुढे नतमस्तक होतात.

नाममात्र शुल्कात उच्च शिक्षण देणारे देशातील हे पहिले विद्यापीठ आहे. मराठवाडा, विदर्भ, खानदेश, भागातील शेतकरी, शेतमजूर, दलित, कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक भूमी म्हणून विद्यापीठाने नाव लौकिक मिळविला व लाखो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देऊन त्यांच्या आयुष्याला आकार दिला, देत आहे आणि पुढेही देत राहील, अशीही अपेक्षा करुया. अंखेर सतरा वर्षाच्या लढाईनंतर औरंगाबाद- छत्रपती संभाजीनगरातील मराठवाडा विद्यापीठाला दि.१४ जानेवारी १९९४ रोजी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नाव विस्तारित करण्यात आले. नामांतराची अधिकृत घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री मा.शरद पवार साहेब यांनी केली.

!! मराठवाडा विद्यापीठ नामांतर दिनानिमित्त सर्व बहुजनांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोचविण्यासाठी केंद्र व राज्य शासन कटिबद्ध - केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव



**बुलढाणा (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गोरगरीब जनतेला चांगली आरोग्य सेवा मिळाली पाहिजे, त्यांच्यावरही चांगले उपचार झाले पाहिजे यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने आयुष्यमान भारत योजना संपूर्ण देशामध्ये राबवली जात आहे. या योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचं काम हे सरकारच्या माध्यमातून केल्या जात आहे, असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्ह्यातील सिंदखेड राजा आणि चिखली तालुक्यातील सवणा येथे मोफ़त आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही आरोग्य शिबिराचे उद्घाटन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. सिंदखेड राजा येथील आरोग्य शिबिरात माजी आमदार शशिकांत खेडेकर, जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, तहसिलदार, मुख्याधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

तर सवणा येथील आरोग्य शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचे खाजगी सचिव विद्याधर महाले, गजानन मोरे, शिवाजीराव देशमुख, विलास घोलप, नियोजन समिती अध्यक्ष कैलास भालेकर, माजी.जि.प.सदस्य शरद हाडे, संजय भुतेकर उपस्थित होते. यावेळी शिबीरार्थींना मार्गदर्शन करतांना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, या देशातील गोरगरीब जनतेला त्यांच्याच भागामध्ये चांगल्या प्रकारची आरोग्य सुविधा कशाप्रकारे मिळेल या दृष्टिकोनातून राज्य शासनाकडून प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील आणि राज्यातील आरोग्याची सेवा सक्षम करून लोकांना सहज उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र आणि राज्यातील राज्य शासन कटिबध्द आहे. गोरगरीब जनतेला महानगरातील हॉस्पिटलमध्येही आरोग्य उपचार घेता यावा यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने आयुष्यमान भारत योजना राबविली जात आहे. या योजनेचा सर्वसामान्य जनतेने लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. जाधव यांनी केले. या शिबीरामध्ये अस्थिरोग तज्ञ, कान नाक घसा, मूत्रपिंड व मूत्रमार्ग विकार तज्ञ, कर्करोग तज्ञ, बालरोग तज्ञ, पोटविकार तज्ञ, मानसिक आजार तज्ञ, हृदयरोग तज्ञ, मेंदु तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आली. याशिवाय नेत्र तपासणी, मोफ़त चष्मे आणि औषधीचे वाटप करण्यात आले. या शिबिरात अनेक गरजूंनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आरोग्य सेवेचा लाभ घेतला.

# अचूक बिलिंगसाठी सदोष, नादुरुस्त मीटर तातडीने बदला

## महावितरणचे सीएमडी श्री. लोकेश चंद्र यांचे निर्देश



**पुणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

ग्राहकसेवेच्या कृती मानकांनुसार निश्चित केलेल्या कालावधीत मागेल त्यांना नवीन वीजजोडणी त्वरीत देण्यात यावी. सोबतच महावितरण व वीजग्राहकांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आणि अचूक बिलिंगसाठी नादुरुस्त व सदोष वीजमीटर तातडीने बदलण्यात यावेत असे निर्देश महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी मंगळवारी (दि. १४) दिले.

पुणे येथील 'प्रकाशभवन'मध्ये आयोजित पुणे प्रादेशिक विभागातील विविध कामांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी पुणे प्रादेशिक संचालक श्री. भुजंग खंदारे, मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार (पुणे), श्री. धर्मराज पेठकर (बारामती), श्री. स्वप्निल काटकर (कोल्हापूर), प्रभारी महाव्यवस्थापक (वित्त) सौ. माधुरी राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र म्हणाले, की वीजग्राहकांनी वापरलेल्या प्रत्येक युनिटचे बिलिंग होणे आवश्यक आहे. मात्र नादुरुस्त किंवा सदोष वीजमीटरमुळे महावितरण व ग्राहकांना आर्थिक फ़टका बसतो. वीजग्राहकांना मासिक वीजवापर देखील अचूक कळत नाही. त्यामुळे प्राधान्याने नवीन वीजजोडण्या देण्यासोबतच सदोष व नादुरुस्त वीजमीटर बदलण्यास वेग देण्यात आला आहे. नवीन वीजमीटर मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे नादुरुस्त, सदोष वीजमीटर तातडीने बदलण्यात यावेत, अशी सूचना यावेळी त्यांनी केली.

वीजबिलांच्या वसूलीमध्ये सुमारे ८५ ते ९० टक्के वीजग्राहक नियमित वीजबिल भरतात. मात्र उर्वरित १० ते १५ टक्के ग्राहक वीजबिल भरण्याकडे दरमहा दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे थकबाकी वाढत जाते. अशा थकबाकीदार ग्राहकांवर लक्ष केंद्रीत करून थकबाकी व चालू वीजबिल वसूलीवर भर द्यावा. प्रामुख्याने उच्चदाब वर्गवारीमध्ये ग्राहकांकडे थकबाकी वाढणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यांची थकबाकी महावितरणकडे जमा असलेल्या अनामत रकमेएवढी झाल्यास वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्याची कार्यवाही करावी असे श्री. लोकेश चंद्र यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, राज्याच्या वीजक्षेत्रात महावितरणची आश्वासक वाटचाल सुरु आहे. ऐन हिवाळ्यात शनिवारी (दि. ११) २५ हजार ८०८ मेगावॅट विजेची विक्रमी मागणी होती.

ती पूर्वनियोजनामुळे अतिरिक्त वीज खरेदी न करता पूर्ण करण्यात आली. अन्य राज्यांच्या तुलनेत महावितरणकडून सर्वाधिक मागेल त्यांना सौर कृषिपंप देण्यात आले आहेत. तसेच मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार आहे सोबतच प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक वीजदर देखील कमी होणार आहे. त्यामुळे या योजनेच्या वेगवान अंमलबजावणीसाठी युद्धपातळीवर कामे पूर्ण करावीत. त्यासाठी महसूल विभागाशी समन्वय ठेवावा असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी दिले.

या बैठकीला अधीक्षक अभियंते सर्वश्री विजयानंद काळे, अरविंद बुलबुले, सिंहाजीराव गायकवाड, युवराज जरग, अमित कुलकर्णी, अनिल घोगरे, संजीव नेहेते, गणपत लटपटे, दीपक लहामगे, भाऊसाहेब हळनोर, चंद्रशेखर पाटील, पुनम रोकडे, सुरेश सवाईराम (प्रभारी), साईप्रकाश आरळी (प्रभारी) आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# पानिपत शौर्य स्मारकाच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य - मुख्यमंत्री फडणवीस




**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

मराठ्यांनी राष्ट्र संरक्षणार्थ पानिपतच्या युद्धात जीवाची बाजी लावून लढा दिला. या युद्धाच्या शौर्य स्मारकासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पानिपत येथे दिली.

पानिपत युद्धाला २६४ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने येथील कालाआम परिसरात आज मराठा शौर्य दिनाचे आयोजन करण्यात आले होते. मराठा वीर योद्धयांना अभिवादन करण्यासाठी गत १९ वर्षांपासून पानिपत शौर्य समितीच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. याप्रसंगी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा तथा युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे राजशिष्टाचार तथा पणन मंत्री जयकुमार रावल, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, खासदार राजाभाऊ वाझे आणि हरियाणा शासनाचे अधिकारी, स्थानिक नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, या युद्ध मोहिमेतून त्याकाळी बरेच काही शिकता आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला जाती पातीपलीकडे देशासाठी लढण्याची दिलेली शिकवण मावळ्यांनी पाळली आणि म्हणून दिल्लीचे तख्त मराठ्यांनी एकेकाळी राखले. ही एकीची शिकवण कायम ठेवून विकसित महाराष्ट्र आणि भारत घडवूया ,असेही ते म्हणाले. या स्मारकासाठी अधिकची जमीन आवश्यक असल्याने त्यासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे नमूद करुन या परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळाही राज्य शासनातर्फे उभारला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली. यासाठी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल समन्वयक म्हणून काम पाहतील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम ाचे प्रास्ताविक पानिपत शौर्य समितीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांनी केले. यावेळी. समितीच्यावतीने अमरावतीचे नितीन धांडे यांना शौर्यस्मारक पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सशक्त भारत परिवार, मराठा सेवा संघ, हरियाणा समस्त धानक मराठा समाज, धनुष्यधारी धानक समाज, मराठा उत्थान समिती, मुदगल चेतना परिवार चेरिटेबल ट्रस्ट छत्रपती शिवाजी महाराज वेलफेयर संघ, पानिपत सार्वजानिक मराठा गणेश मंडळ, यांनी प्रयत्न केले.

# उठा, जागे व्हा. तोपर्यंत थांबू नका...- स्वामी विवेकानंद!

**भारत सरकारने सन १९८५मध्ये १२ जानेवारी या दिवसाला राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करायचे ठरवले. या दिवसाला असे काय महत्व आहे? तर या दिवशी स्वामी विवेकानंद यांची पावन जयंती असते. उठा, जागे व्हा आणि तोपर्यंत थांबू नका जोपर्यंत तुम्हाला तुमचे ध्येय मिळत नाही हा संदेश स्वामी विवेकानंद यांनी तरुणांना दिला. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजीं यांच्या लेखणीतून जाणा उद्बोधक माहिती... संपादक.**

**भारतावर** व जगावर स्वामी विवेकानंदांचा प्रभाव दिसून येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहरूंचे पीए एम.ओ.मथाई यांना म्हणाले होते की, ‘अलिकडच्या शतकात भारताने निर्माण केलेला सर्वात मोठा माणूस म्हणजे विवेकानंद आहेत, गांधी नव्हे.‘ नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणाले होते, ‘जोपर्यंत बंगालचा संबंध आहे, आम्ही विवेकानंदांना आधुनिक राष्ट्रीय चळवळीचे आध्यात्मिक पिता म्हणू शकतो.‘ स्वामी विवेकानंदांच्या कार्याचा प्रभाव तत्कालीन समाजावर व त्यांच्या अनुयायांवर दोन वेगवेगळ्या प्रकारे पडला. काही विषय, व्यक्ती आणि प्रसंग यांवर त्यांनी कडाडून तोफ डागली. तर काही बाबतीत वाऱ्याच्या मंद झुळकीने फुलाची पाकळी जशी हळुवारपणे उमलते तसा त्यांचा प्रभाव होता. मानवी जीवनावर स्वामीजींच्या एकूण झालेल्या प्रभावाची अशी वर्गवारी करता येईल- त्यांनी वेदान्ताकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. निस्वार्थी मानवसेवा हाच खरा धर्म होय, असे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. भारतातील राष्ट्रीय, आध्यात्मिक चळवळी व इतर सामाजिक सेवाकार्ये या सगळ्यांच्या मागे प्रत्यक्षाप्रत्यक्षरीत्या स्वामीजींची प्रेरणा होती व आहे. पाश्चिमात्य जगात त्यांनी भारताचे आध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील दूत म्हणून भूमिका बजावली.

स्वामी विवेकानंद हे मूळचे बंगालचे रहिवासी असलेले भारतीय हिंदू विचारवंत होते. तरुणपणी ते रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य झाले आणि रामकृष्णांचा संदेश जनमानसांत पोहचवण्यास त्यांनी रामकृष्ण मिशन सुरू केले. जगामध्ये रामकृष्ण मिशनच्या अनेक शाखा आहेत. भारत सरकारतर्फे विवेकानंदांचा जन्मदिवस हा युवक दिन म्हणून साजरा केला जातो. उत्तर कोलकत्ता सिमलापल्ली येथे दि.१२ जानेवारी १८६३ रोजी म्हणजेच पौष कृष्ण सप्तमी, संक्रांतीच्या दिवशी विवेकानंदांचा जन्म झाला. त्यांचे नाव नरेंद्र ठेवण्यात आले. वडील विश्वनाथ दत्त हे कोलकाता उच्च न्यायालयात वकीलाचे ॲटर्नी होते.



ते सामाजिक आणि धार्मिक बाबीत पुरोगामी विचाराचे आणि दयाळू स्वभावाचे होते. आई भुवनेश्वरी देवी या धार्मिक वृत्तीच्या होत्या. नरेंद्रनाथांच्या विचारसरणीला आकार देण्यात त्यांच्या पालकांचा अनमोल वाटा होता. नरेंद्रनाथांना दर्शनशास्त्रे, इतिहास, समाजशास्त्रे, कला, साहित्य इत्यादी अनेक विषयांत रुची आणि गती होती. वेद, उपनिषदे, राम ायण, महाभारत, भगवतगीता आदि धार्मिक साहित्यात त्यांनी विशेष आवड दाखवली. त्यांना शास्त्रीय संगीताची देखील जाण होती. त्यांनी बेनी गुप्ता व अहमद खान या उस्तादांकडून गायन-वादनाचे रीतसर शिक्षणही घेतले. किशोरावस्थेपासूनच ते व्यायाम, खेळ आदी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत. जुनाट अंधश्रद्धा आणि जात्याधारित भेदभाव त्यांच्या वैधतेसंबंधी त्यांनी लहान वयातच प्रश्न उपस्थित केले होते.

सारासार विचार व व्यवहारी दृष्टिकोन यांचा आधार नसलेली कुठलीही गोष्ट स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला होता. विवेकानंद हे मित्र परिवारात प्रिय होते. त्यांचे मित्र त्यांना बिले या नावाने तर त्यांचे गुरू नोरेन या शब्दाने हाक मारत. त्यांना वाचन, व्यायाम, कुस्ती, मुष्टियुद्ध, पोहणे, होडी वल्हवणे, घोडेस्वारी, लाठियुद्ध, गायन आणि वादन इत्यादी छंद होते. गुरूदेव रामकृष्णांनी नरेंद्रनाथांना संन्यासदीक्षा देऊन त्यांचे नामकरण स्वामी विवेकानंद असे केले. राजा अजितसिंग खेत्री यांनीही दि.१० मे १८९३ रोजी त्यांना विवेकानंद हेच नाव दिले.

स्वामी विवेकानंद म्हणजे योद्धा, संन्यासी, आणि तरुण पिढीचे अखंड प्रेरणास्रोत, ज्यांनी फक्त भारतातीलच नाही तर संपूर्ण जगातल्या युवा पिढीसमोर आदर्श ठेवला. सगळे देश भारताकडे मोठ्या आशेने बघत आहेत. का? तर भारत एक संधीचा देश आहे. या देशात अनेक संधी आज वाट बघत आहेत. जग भारताकडे आशेने बघत आहे. कारण आज आपला देश सर्वात तरुण देश आहे. ज्या देशाची ६५ टक्के लोकसंख्या तरुण असेल, ३५ वर्षांच्या आतली असेल, तो देश किती भाग्यवान आहे! आमच्याकडे आज कोटी कोटी युवा जनता आहे. जिथे ही तरुणाई असते, तिथे संकल्पांना काही सीमा नसतात, बंधने नसतात. कधी कधी आपल्या देशात युवकांच्या वेगवेगळ्या व्याख्या ऐकायला मिळतात. शास्त्रापासून आजपर्यंत तरुणाईच्या अनेक व्याख्या झाल्या आहेत. प्रत्येकाचा आपापला दृष्टीकोन असतो. अनेकांना वय हेच तारुण्याची ओळख आहे, असे वाटते. युवापिढी म्हणजे नव्या विचारांची आणि आधुनिकतेची सांगड घालून आपले म्हणणे समाजापुढे मांडणारी नव्या जोशाची पिढी आहे. खरे पाहता आपल्याला विविध प्रकारच्या क्षेत्रात चांगले यश पादाक्रांत करण्याची सुवर्ण संधी आणि पुरेसा वेळ आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी तरुणांची संख्या अधिक आहे. तरूण म्हणजे प्रचंड उत्साह, काहीतरी करून दाखवण्याची धडपड होय. तरुण म्हणजे प्रचंड जोश, तरुण म्हणजे अफाट इच्छाशक्तीः अशी कितीतरी विशेषण तरुणांना लागू पडतात. जगात तरुणांची संख्या अधिक आहे, त्यामुळे विविध तंत्रज्ञानात तरुणांची भरारी विलक्षणीय आहे.

कधी तरुणाईचे पाऊल भलत्याच दिशेने पडताना दिसत आहे. त्याचे कारण म्हणजे व्यसनाधीनता, चंगळवाद, सोशल मिडीयाचा अतिरेक आदी आहेत. ही तरुणपिढीला लागलेली वाळवी आहे. कुठल्याही देशाची प्रगती ही तिथल्या तरुणांवर अवलंबून असते त्यामुळे आपल्या देशाला भक्कम आधार आपण तरुणच देऊ शकतो, हे प्रत्येकाने ध्यानात घेणे गरजेचे आहे. विशेषतः भारताचे सरासरी वय हे २८ आहे. त्यामुळे भारत जगातील सर्वात तरुण देश ठरतो.

युवा वर्गाने स्व:ताला टेक्नॉलॉजीशी इतके सुसंगत ठेवले आहे, की ते जगाशी ओळख ठेवून आहेत. कुठे काय घडतेय हे त्यांना माहीत असते. पण याच टेक्नॉलॉजीशी ते इतके भावनिक गुंतले गेले आहेत, की त्यामुळे तिथूनच त्यांना नैराश्यही येते. स्वामी विवेकानंदर्जीनी दि.४ जुलै १९०२ रोजी कोलकात्याजवळील बेलूर मठात समाधी घेतली. समाधीच्या दिवशी त्यांनी पहाटे बेलूर मठात परिव्राजकांना शुक्ल यजुर्वेदाचा पाठ शिकवला. स्वामी प्रेमानंद या गुरुबंधूंसमवेत काही काळ फिरून त्यांना रामकृष्ण मठाच्या भविष्यासंबंधात काही सूचना केल्या. ध्यान करत असतांना रात्री त्यांनी समाधी घेतली. चाळीस वर्षापर्यंत आपण जगणार नाही, ही स्वतःची भविष्यवाणी खरी केली. खरच आपणच आपले भविष्य घडवायला हवे. कोणावरही अवलंबून राहणे, हे योग्य नाहीच! !!स्वामी विवेकानंदर्जीना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन व चिरतरुण भारताला राष्ट्रीय युवा दिवसाच्या प्रेरणादायी हार्दिक शुभेच्छा जी !!

**- श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**

(वैभवशाली भारतातील थोर पुरुषांच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक व विश्लेषक.), द्वारा- प. पू. गुरूदेव हरदेव कृपानिवास. मु. रामनगर वॉर्ड नं.२०, गडचिरोली. पो. ता. जि. गडचिरोली (पिन- ४४२६०५). फक्त व्हा. नं. ७४१४९८३३३९. इमेल- krishnadas.nirankari@gmail.com

# महापारेषणच्या राज्य भार प्रेषण केंद्राला सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल दोन राष्ट्रीय पुरस्कार



**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

विजेच्या उपलब्धतेनुसार पुरवठा व त्याचे नियंत्रण करण्यासाठी नावीन्यपूर्ण योजनांची यशस्वी अंमलबजावणी केल्याबद्दल महापारेषणच्या महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीला देशातील सर्वोत्कृष्ट भार प्रेषण केंद्र व ओपन एक्सेस (एसएलडीसी) या दोन राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी अभिनंदन केले आहे.

इंडिपेंडेन्ट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आयपीपीएआय) या राष्ट्रीय संस्थेने बेळगावमध्ये हा पुरस्कार सोहळा आयोजित केला होता. देशभरातील विद्युत कंपन्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून हे पुरस्कार दिले.

याप्रसंगी केंद्रीय विद्युत प्राधिकरणचे अध्यक्ष घनश्याम प्रसाद, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाचे माजी अध्यक्ष व्ही. राजा, केंद्रीय विद्युत प्राधिकरणचे माजी अध्यक्ष राकेशनाथ, ग्रीड इंडियाचे माजी व्यवस्थापकीय संचालक एस के. सोनी यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण झाले.

या वेळी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीचे अधीक्षक अभियंता मिलिंद देवळे, उमेश भगत, उपमहाव्यवस्थापक नितीन पौनीकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) आनंद दळवी, कार्यकारी अभियंता दिनेश पाटील, व्यवस्थापक (मानव संसाधन) योगेश अघोर, सहाय्यक अभियंता विजय कांबळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्कारासाठी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे कार्यकारी संचालक शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता गिरीश पंतोजी यांचे मार्गदर्शन लाभले.

# आनंदवन येथील संस्थेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून ३ कोटी ८ लाखांचा निधी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

चंद्रपूर जिल्ह्याच्या वरोरा येथील आनंदवन महारोगी सेवा समिती संस्थेला कुष्ठरुग्णांचे उपचार आणि पुनर्वसनासाठी १ कोटी ८६ लाख रुपये तर, आनंद अंध, मुकबधीर आणि संधीनिकेतन दिव्यांग कार्यशाळेसाठी १ कोटी २२ लाख रुपये असे एकूण ३ कोटी ८ लाख रुपयांचा निधी तातडीने वितरीत करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी दिले असून उपमुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर निधी वितरीत करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तातडीने दखल घेऊन केलेल्या या कार्यवाहीमुळे थोर समाजसेवक दिवंगत बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांनी ७५ वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या महारोगी सेवा समितीसमोरील आर्थिक



अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे.

बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांनी कुष्ठरुग्णांच्या सेवेसाठी ७५ वर्षांपूर्वी १९४९ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याच्या वरोरा तालुक्यातील आनंदवन येथे महारोगी सेवा समितीची स्थापना केली आहे. संस्थेचं यंदा अमृतमहोत्सवी वर्ष असून संस्था आर्थिक अडचणीत असल्याची बाब संस्थेचे सचिव डॉ. विकास आमटे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या लक्षात आणून दिली. डॉ. विकास आमटे यांच्या मागणीची तातडीने दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संस्थेस ३ कोटी ८ लाख रुपयांचा निधी तातडीने वितरीत करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. त्यानुसार तातडीने कार्यवाही करीत हा निधी संस्थेस वितरीत करण्यात आला.

थोर समाजसेवक बाबा आमटे आणि साधनाताई यांनी स्थापन केलेली ही संस्था गेली ७५ वर्षे सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून कुष्ठरुग्णांचे उपचार, पुनर्वसनाच्या माध्यमातून त्यांची सेवा करत आहे. संस्थेतर्फे ग्रामीण भागांतील प्रकल्पांत पुनर्वसित दीड हजार कुष्ठरोग मुक्त दिव्यांग-निराधार ,वृद्ध, अनाथ, परित्यक्ता, मानसिकदृष्ट्या अपंग बांधवांची आणि त्यांच्या मुलांची काळजी घेतली जाते. विशेष शाळा आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रात निवासी तीनशे दिव्यांग विद्यार्थी-प्रशिक्षणार्थींना शिक्षण-प्रशिक्षण दिले जाते.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अनिवासी विज्ञान, कला, वाणिज्य शाखेच्या साडेतीन हजार विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या शिक्षणाची सोयही संस्थेमार्फत केली जात आहे. संस्थेच्या या सामाजिक बांधलकी आणि सेवाकार्याची दखल घेत उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी राज्य शासनाकडून देय ३ कोटी ८ लाख रुपयांचा निधी संस्थेस तत्काळ वितरीत केला आहे.



# महिला व बालविकास विभागातील योजना, उपक्रमांना गती द्यावी - मंत्री आदिती तटकरे

**मुंबई :** महिला व बालविकास विभागातर्फे महिला आणि बालकांच्या विकासासाठी विविध योजना व उपक्रम राबविण्यात येतात. या योजना व उपक्रमांना गती द्यावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विभागाच्या आढावा बैठकीत दिले. यावेळी विभागाचे सचिव अनुपकुमार यादव उपस्थित होते.

यावेळी मंत्री कु. तटकरे यांनी राज्यातील महिला व बालकांच्या विकासासाठी राबविण्यात येणारा ‘सक्षम अंगणवाडी आणि पोषण’ उपक्रम, ‘ मिशन वात्सल्य ‘, ‘ मातृवंदना योजना ‘, ‘वन स्टॉप सेंटर (सखी)’ या योजना आणि उपक्रमांवर खर्च करण्यात येणाऱ्या निधी आणि विना खर्चित निधी याबाबत माहिती घेतली.



नामविस्तार दिनानिमित्त, विद्यापीठ गेटवर जावून सकल मराठा समाजाच्या वतीने अभिवादन केले.

# नामांतर आंदोलन हे लोकशाहीच्या हिताचे होते भिमसैनिकांनी तो लढा लढला त्यांना शासनाने पेंशन लागू करावे- बागडे!




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळाले पाहिजे या साठी शासनाने राज्य विधानसभेच्या दोन्ही सभागृहात तत्कालीन मुख्यमंत्री यांनी ठराव पारित केला त्याची अंमलबजावणी करणे हि शासनाची जबाबदारी होती परंतु तत्कालीन शासनाने सोळा वर्षांचा कालावधीतील आंबेडकरी चळवळीतील तरूणांना या आंदोलनात झोकाला लावून त्यांचे उभे आयुष्य बरबाद केले. हे चळवळीतील कार्यकर्ते विसरू शकत नाही.

या आंदोलनात काही नेते आबाद झाले. म्हणजे चळवळीतील कार्यकर्त्यांच्या घरादाराची राखरांगोळी झाली याची भरपाई आजपण कोणी करण्यासाठी तयार नाही ज्याप्रमाणे आणिबाणीच्या काळात दुःख भोगलेल्यां पेन्शनची मागणी होऊ शकते मग लोकशाहीच्या हिताचे सोळा वर्ष आंदोलन करणारे भिम सैनिक यांना पेंशन का देण्यात येऊ नये हि मागणी रास्त आहे असे प्रतिपादन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केले ते मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार वर्धापनदिनानिमित्त भिम सैनिक दखल लो अभियान मार्च चे प्रारंभ करताना विद्यापीठ गेट समोर आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

अभियानाचे नेतृत्व आंरिमो मराठवाडा प्रदेश अध्यक्ष बापू सय्यद सलीम यांनी केले तर आयोजन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत सोनवणे , शहर अध्यक्ष सतीश जाधव , शहर संघटक राजहंस धुळे यांनी केले. मार्च मध्ये मुंबई प्रदेश प्रभारी विकास काटे शाम भाई बागुल, परभणी जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव सुंगधे, नांदेड जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव गच्चे , प्रदेश महिला मोर्चा सचिव सुनिता दाभाडे, महिला मोर्चा मुंबई प्रभारी कविता पुणेकर, संभाजी नगर महिला मोर्चा अध्यक्षा शालू भोकरे,ज्योतिताई पारखे, भावराव पारखे ,नागपूर शहर पदाधिकारी राजीव कांबळे, विनोद रंगारी, मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष दिवाकर दिनकर, हिंगोली जिल्हा सचिव सचिन अंभोरे, आणि मोठ्या संख्येने महिला पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते

# रविवारच्या जनआक्रोश मोर्चाची जय्यत तयारी

## सकल मराठा समाजाबरोबरच विविध जाती, धर्माच्या पक्ष संघटनांचाही मोठा सहभाग राहणार

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मस्साजोग आणि परभणी घटनेच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने येत्या रविवारी (दि. १९ जानेवारी) छत्रपती संभाजीनगरात सर्व पक्ष आणि सर्व जाती- धर्मांच्या बांधवाना सोबत घेऊन 'जन आक्रोश मोर्चा' काढण्याचा निर्णय घेतला आहे. या मोर्चाच्या तयारीसाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत विविध जाती, धर्माच्या व पक्ष संघटनांच्या नेते, पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सर्वांनी मिळून या शहरात अभूतपूर्व असा मूक मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला.

रविवारी चिकलठाण्यातील शिवनेरी लॉन्स येथे ही तयारीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत म ोर्चाचा मार्ग, तयारी याची आखणी करण्यात आली. आरक्षणासाठी मराठा समाजाच्या वतीने आतापर्यंत जसे एतिहासिक मूक मोर्चे काढण्यात आले, त्याच धर्तीवर हा मोर्चा काढण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला.

हा मोर्चा कोणत्याही समाजाविरूद्ध किंवा एखाद्या समुदायाविरूद्ध नसून प्रवृत्तीविरूद्ध आहे, याचा सर्वच स्तरातून निषेध होणे गरजेचे आहे. या दोन्ही घटनेतील आरोपींना कठोरात कठोर शासन व्हावे आणि अशा प्रवृत्तींना आळा बसावा, यासाठी सर्वांनी एक होणे गरजेचे आहे, असा सूर या बैठकीत निघाला. या मोर्चात सकल मराठा



समाजाबरोबरच सर्व आंबेडकरी संघटना, मुस्मिम संघटना, विविध आठरा पगड जाती धर्माच्या संघटना मोठ्या ताकतीने सहभागी होतील, असे नियोजन करण्यात आले.

या बैठकीला मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाजाच्या सर्वच नेते, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याचबरोबर आंबेडकरी चळवळीतील मुकुंद सोनवणे, प्राचार्य सुनील वाकेकर,पंडित बोर्डे, कृष्णा बनकर, गौतम खरात, गौतम लांडगे, अरूण बोर्डे, मिलींद दाभाडे, विजय वाहूळ, विशाल इंगळे, राहूल सावंत, राखी सुरडकर, विजय निकाळजे, शेख युसफ, शेख तबरेज, खालेद पठाण, राजेश मुंडे, एल. डी. ताटू, राजकुमार गाजरे यांच्यासह विविध जाती, धर्माचे अनेक वरिष्ठ नेते, चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

गावागावात, वॉर्डांमध्ये बैठक

या मोर्चाच्या जनजागृतीसाठी आणि तयारीसाठी जिल्ह्यातील सर्वच गावागावात बैठका घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात समाज बांधव मोर्चासाठी येणार आहेत. त्याबरोबर शहरातही प्रत्येक वॉर्डात बैठका घेण्यात येत आहेत. त्यामुळे मोर्चाला मोठ्या संख्येने विविध जाती, धर्माचे बांधव येण्याची शक्यता आहे.

### जानेवारी अखेरपर्यंत राहणार थंडीचा प्रभाव

पुणे - राज्यातील थंडीत चढ उतार होत असून, थंडीचा प्रभाव जानेवारी अखेरपर्यंत राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. गेले काही दिवस राज्यात थंडीचा जोर वाढला आहे. अनेक भागातील कमाल तसेच किमान तापमान घटले आहे. गेल्या २४ तासात काही भागात कमाल तापमान १ ते ३ अंश सेल्सिअसने वाढल्याने उबदारपणा जाणवत आहे. मात्र मंगळवारनंतर पुन्हा थंडीचा कडाका वाढणार आहे.

रविवारपर्यंत थंडीची अशीच स्थिती असेल. याबाबतीत बोलताना ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे म्हणाले, सध्या मुंबईसह संपूर्ण कोकणातील ७ जिल्ह्यांत दुपारी ३ चे कमाल तापमान सरासरीच्या जवळपास १ डिग्रीने कमी तर पहाटेचे किमान एक डिग्रीने वाढलेले जाणवत आहे.

# नायलॉन मांजाचा वापर करू नये यासाठी पोलीस मित्रातर्फे अभियान






**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पोलीस मित्रा तर्फे नायलॉन मांजा वापरायचा नाही हे अभियान गेल्या १५ दिवसापासून चालू आहे. आज रेली होती आता पर्यंत बळीराम पाटील स्कूल मध्ये,वेणुताई स्कूल मध्ये,

मुकुल मंदिर स्कूल, वार्डस्कूल एन ६ सिडको, जिगीशा स्कूल मधे, एस आर स्कूल, महापालिका शाळा एन ७ छत्रपती संभाजी स्कूलमधे ह्या पूर्ण शाळा मध्ये नायलॉन मांजा चे दुष्परिणाम,पर्यावरण विषयक माहिती,सायबर क्राईम,स्वच्छता अभियान,१८ वर्षाखालील मुलांना मोटारसायकलचालल्याने होणारे गुन्हे,वेसण मुकती या विषयावर जनजागृती करण्यासाठी अभियान चालू आहे, सोमनाथ जाधव साहेब पोलीस निरीक्षक सिडको पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शन खाली हे अभियान सुरु आहे. पोलीस मित्र संघाचे अध्यक्ष श्री ज्ञानदेव मोहिते,उपाध्यक्ष श्री भानुदास वाहुळकर, महासचिव श्री दत्तात्रय सबनीस, सहसचिव श्री राजाराम पाटील,कोषाधक्ष श्री विजय पवार आणि सर्व सभासद ह्या अभियान मध्ये सहभागी झाले आहेत.

# आंबेडकरवादी सर्वपक्षीय नामविस्तार दिन सत्कार समितीच्या वतीने भीमसैनिकांचा गौरव व स्वागत

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त १४ जानेवारी रोजी विद्यापीठ गेटवर महाराष्ट्र भरातून मोठ्या प्रमाणात आंबेडकरवादी एकत्र येऊन अभिवादन करतात. या ऐतिहासिक दिवशी विविध पक्ष व संघटनांकडून स्टेज उभारून भाषणे, अन्नदान, रक्तदान शिबिरे व अन्य सामाजिक उपक्रम राबवले जातात. यावर्षी पहिल्यांदाच आंबेडकरवादी बहुजन समितीचे अध्यक्ष,पँथर दीपक निकाळजे यांनी विद्यापीठ गेटजवळ स्वागत स्टेज उभारले होते. या स्टेजवरून नामविस्तार चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान देणा□्या भीमसैनिकांचा व त्यांच्या नातेवाईकांचा सत्कार करण्यात आला. नामांतर चळवळीत बलिदान दिलेल्या व्यक्तींना आदरांजली वाहून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.

यावर्षी पहिल्यांदाच असा स्वागत स्टेज उभारण्यात आला. याठिकाणी जनसामान्यांप्रती प्रबोधनपर घोषणा करण्यात आल्या. जसे की,

**'आपली, आणि लेकरांची काळजी घ्या.' 'पाकिटे व दागिने, मौल्यमान वस्तू सांभाळा.'**

'गडबड करू नका व अनुचित प्रकार घडू देऊ नका.' 'अशा घटना घडल्यास तत्काळ पोलिसांना कळवा.' गर्दीमध्ये हरवलेले अनेक लहान मुलांचा, महिला, पुरुषांचा शोध घेण्यासाठी या स्टेजचा योग्य वापर झाला. स्टेजवरून सामाजिक शिस्त राखण्याचे सतत आवाहन करण्यात आले आणि उपस्थितांनी देखील त्यास चांगला प्रतिसाद दिला. या प्रसंगी अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त, उपायुक्त नितीन बगाटे, खासदार चंद्रकांत हंडोरे, यांच्यासह अनेकांनी स्टेजला भेट देऊन अभिवादन केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये दीपक निकाळजे, आनंद कस्तुरे, प्रांतोष वाघमारे, नागेश केदारे, मोहन म्हस्के, अमित वाहूळ, सचिन जोगदंडे, मुकेश खोतकर, कपिल बनकर यांचे महत्त्वाचे सहकार्य लाभले. ही नामविस्तार दिनानिमित्त झालेली स्वागत व सत्काराची परंपरा पुढील वर्षांमध्येही अशीच भव्य स्वरूपात पार पडावी, असे उपस्थितांनी मत व्यक्त केले.




हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**